**सन्माननीय अध्यक्ष महोदय,**

मी आपल्या अनुमतीने सन २०२०-२१ या वर्षाचा राज्याचा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करत आहे.

१०६ हुतात्म्यांच्या बलिदानाने, मोठ्या संघर्षानंतर अस्तित्वात आलेल्या गौरवास्पद अशा आपल्या महाराष्ट्र राज्याचे हे हीरक महोत्सवी वर्ष आहे. आपण ते मोठ्या अभिमानाने साजरे करणार आहोत.

सन २०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले. मतदारांनी दाखवलेला विश्वास आणि जनहित या दोनच गोष्टी महत्त्वाच्या मानून शिवसेना, राष्ट्रवादी कॉँग्रेस, कॉँग्रेस आणि मित्रपक्ष एकत्र आले. अतिशय समंजसपणे सुरु असलेल्या या मित्रपक्षांच्या लोकाभिमुख सरकारचा पहिला संपूर्ण अर्थसंकल्प मांडण्याची संधी मला मिळत आहे, याबद्दल सर्वप्रथम मी आमच्या सर्व मित्रपक्षांच्या नेत्यांचे आणि आपले आभार मानतो. आजच या सरकारने १०० दिवसही पुर्ण केले आहेत. हा एक विशेष योगायोग म्हणावा लागेल.

अध्यक्ष महोदय, सध्याचा काळ हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत गुंतागुंतीचा आणि कसोटीचा काळ आहे, हे आपणही जाणता. आर्थिक मंदीच्या सावटामुळे देशाला गंभीर परिणामांना सामोरे जावे लागत आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्न, उत्पादन वाढ, रोजगार निर्मिती, अर्थव्यवस्थेच्या विकासाची गती या सर्वच बाबतीत राष्ट्रीय पातळीवरचा आलेख उतरता दिसतो आहे. देश पातळीवरील या बाबींचा परिणाम राज्य पातळीवरही जाणवतो आहे.

२.	राज्यात कृषि व उद्योग क्षेत्राची प्रगती व्हावी, राज्यातील सर्व भागांचा; विशेषतः समाजातील सर्व घटकांचा विकास व्हावा, त्यायोगे विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण, तरुणांना रोजगार आणि सर्वसामान्य जनतेला दर्जेदार आरोग्यसेवा मिळावी, हा दृष्टीकोन अर्थसंकल्प तयार करताना ठेवला आहे.

३.	सन २०१९-२० आर्थिक वर्षात भारताचे स्थूल देशांतर्गत उत्पन्न रुपये २०४ लक्ष कोटी इतके अपेक्षित असले तरी एकूण आर्थिक मंदीमुळे केंद्र शासनाच्या साधनसंपत्ती संकलनावर विपरीत परिणाम झाला आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार, देशाचा आर्थिक विकास दर गेल्या काही वर्षात प्रथमच ५ टक्क्यांपेक्षा खाली आला आहे. मंदीमुळे अनेक उद्योगधंदे आर्थिक अडचणीत आले असून बेरोजगारांची संख्या वाढते आहे. वाहन उद्योग, बांधकाम व्यवसाय, माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, बँकींग, वस्त्रोद्योग व इतर अनेक क्षेत्रातील मंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम होतो आहे. याशिवाय सध्या जगात वेगाने पसरत असलेल्या कोरोना व्हायरसमुळे आधीच मंदीमुळे तणावाखाली असलेली आंतरराष्ट्रीय बाजारपेठ अधिक तणावाखाली आली आहे. या बाबींचा परिणाम होऊन भारतीय अर्थव्यवस्थेवरील ताण आणखी वाढतो आहे.

४.	१४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१९-२० या वित्तीय वर्षात महाराष्ट्र राज्याला केंद्र शासनाकडून मिळणाऱ्या केंद्रीय करातील उत्पन्नाच्या वाट्याची रक्कम सुधारित अंदाजात रुपये ४४ हजार ६७२ कोटींवरुन रुपये ३६ हजार २२० कोटी इतकी कमी करण्यात आली आहे. त्यामुळे, राज्यास प्राप्त होणाऱ्या रकमेत रुपये ८ हजार ४५३ कोटी इतकी घट झाली आहे.

५.	वस्तू व सेवा कर कायदा, २०१७ नुसार केंद्र शासनाकडून वस्तू व सेवा कराच्या नुकसानीचीभरपाई दर दोन महिन्यांनी राज्य शासनास प्राप्त होत असते. मात्र, केंद्र शासनाकडून राज्य शासनास वस्तू व सेवा कराची नुकसानभरपाई मिळण्यास सध्या विलंब होतो आहे. परिणामी राज्याच्या विकास कामावरील खर्चासाठी वेळेवर निधी उपलब्ध होण्यास अडचण निर्माण होत आहे.

६. मागील ५ वर्षांत राज्याने एकूण रुपये २ लक्ष ८२ हजार ४४८ कोटींचे कर्ज उभारले असून, जानेवारी, २०२० अखेर राज्यावरील एकूण शिल्लक कर्ज व दायित्वाची रक्कम रुपये ४ कोटी ३३ लक्ष ९०१ कोटी एवढी आहे. सन २०१४ अखेर राज्य शासनाने दिलेली हमीची रक्कम रुपये ७ हजार ७०९ कोटी इतकी होती. त्यात वाढ होऊन सद्य:स्थितीत राज्य शासनाने दिलेली हमी रक्कम रुपये ४६ हजार ८९१ कोटी इतकी झाली आहे. राज्य शासनाने हाती घेतलेल्या पायाभूत सुविधा प्रकल्पांची किंमत सुमारे रुपये २ लक्ष ७८ हजार कोटी इतकी असून, त्याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दायित्वही राज्य शासनावर आहे.

देशातील आर्थिक मंदी, राज्यावरील कर्जाचा बोजा, केंद्र शासनाकडून अपेक्षित निधी न मिळणे, तो वेळेवर न मिळणे, उपलब्ध मर्यादित स्त्रोत यांचा विचार करुन आर्थिक शिस्तीचे पालन करत राज्यातील शेतकरी, महिला, तरुण व समाजातील अन्य घटकांच्या रास्त अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी शासनावर आहे. आजच्या मंदीच्या वातावरणात अर्थव्यवस्थेला उत्तेजन देण्याचे आव्हान स्विकारतच राज्य शासनाला पुढील वाटचाल करावी लागणार आहे, याचे भान आम्हाला आहे.

## कृषि

**महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९**

७. शासनाने अत्यंत सोपी, सुलभ, शेतकऱ्यांना हेलपाटे न घालता लाभ घेता येईल अशी सुटसुटीत ‘महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९’ जाहीर केली आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना कर्जाच्या दुष्टचक्रातून बाहेर काढून चिंतामुक्त करण्याचा प्रयत्न होतो आहे. या योजनेत राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका, ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत शेतकऱ्यांनी घेतलेल्या अल्प मुदत पीक कर्जाचा समावेश आहे. शेतकऱ्यांनी २०१५-१६ ते २०१८-१९ या कालावधीत घेतलेले व दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत थकीत खात्यावरील मुद्दल व व्याज यांची रुपये २ लाखाहून अधिक नाही अशी थकीत व परतफेड न झालेली रक्कम माफ

करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सन २०१९-२० मध्ये या प्रयोजनार्थ रुपये १५ हजार कोटी एवढी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे, सन २०२०-२१ मध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, २०१९ साठी ७ हजार कोटी एवढी तरतूद प्रस्तावित असून, त्याद्वारे रु २२ हजार कोटींची तरतूद उपलब्ध होईल.

कर्जमाफीचा निधी शेतकऱ्यांच्या कर्जखात्यावर वर्ग करण्याची कार्यवाही सुरु आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत रुपये ९ हजार ३५ कोटी रक्कम १३ लक्ष ८८ हजार ८५४ शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग झाली असून उर्वरित पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावरही खरीप हंगाम २०२० च्या आधी ही रक्कम वर्ग करण्यात येईल ; जेणेकरुन ते नवीन पीक कर्जासाठी पात्र ठरतील.

याशिवाय आणखी २ योजना मी प्रस्तावित करीत आहे. त्या पुढीलप्रमाणे आहेत.—

दिनांक १ एप्रिल २०१५ ते दिनांक ३१ मार्च २०१९ या कालावधीत घेतलेल्या पीक कर्ज, पीक कर्जाचे पुनर्गठित केलेले कर्ज यांचे मुद्दल व व्याजासह रुपये २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता योजना (One Time Settlement) म्हणून दिनांक ३० सप्टेंबर २०१९ रोजी थकबाकी कर्जापैकी शासनातर्फे रुपये २ लाख रकमेचा लाभ देण्यात येईल. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी रुपये २ लाखांवरील त्यांच्या हिश्श्याची संपुर्ण रक्कम बँकेत जमा केल्यावर शासनातर्फे रुपये २ लाख लाभाची रक्कम शेतकऱ्यांना अदा करण्यात येईल.

सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या वर्षात घेतलेल्या पीक कर्जाची दिनांक ३० जून २०२० पर्यंत पूर्णतः नियमित परतफेड केलेल्या शेतकऱ्यांनी सन २०१८-१९ वर्षात घेतलेल्या पीक कर्जाच्या रक्कमेवर जास्तीत जास्त रुपये ५० हजार प्रोत्साहनपर रक्कम लाभ म्हणून शेतकऱ्यांना देण्यात येईल. मात्र, सन २०१८-१९ या वर्षात घेतलेल्या व त्याची पूर्णतः परतफेड केलेल्या पीक कर्जाची रक्कम रुपये ५० हजार पेक्षा कमी असल्यास, अशा शेतकऱ्यांना त्यांनी सन २०१८-१९ या वर्षात प्रत्यक्ष घेतलेल्या पीक कर्जाच्या रकमेइतका प्रोत्साहनपर लाभ देण्यात येईल.

शेतकऱ्यांना नुकसान भरपाई

८. जुलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूरपरिस्थितीमुळे तसेच ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे राज्यात शेतपिकांचे प्रचंड नुकसान झाले. त्यातील बाधित शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्याने केंद्र शासनाकडे दोन ज्ञापनाद्वारे रुपये १४ हजार ४९६ कोटीच्या रकमेची मागणी केली. केंद्र शासनाने त्यापैकी फक्त रुपये ९५६ कोटी १३ लक्ष रक्कम मंजूर केली. मात्र केंद्राकडून मदत प्राप्त होण्याची वाट न बघता आपल्या शासनाने स्वत:च्या निधीतून शेतकऱ्यांना मदत केली, हे याठिकाणी आवर्जून सांगितले पाहिजे.

पीक विमा योजनेत सुधारणा.

९. 'प्रधानमंत्री फसल बिमा योजना' ही केंद्राची अनेक उणिवा असलेली पीक विमा योजना आहे. ही योजना केंद्राची असली तरी या योजनेत राज्याला मोठ्या प्रमाणावर स्वत:चा निधी द्यावा लागतो. नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेशी मिळत नाही, या संदर्भात प्रचलित असलेले निकष, विमा कंपन्यांशी होत असलेले मतभेद, तक्रारी, मोबदला मिळण्यास होत असलेला विलंब यावर मात करण्यासाठी, उपाययोजना सुचविण्यासाठी मंत्रीस्तरीय अभ्यास गट नेमण्यात आला आहे. या मंत्रीगटाच्या शिफारशीनुसार योजनेत सुधारणा करण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. वन्य प्राण्यांपासून होणाऱ्या पिकाच्या नुकसानीच्या भरपाईचा समावेश पीक विमा योजनेत करता येईल का, याबाबतही हा अभ्यास गट विचार करेल. पीक विमा योजनेसाठी सन २०२०-२१ वर्षात रुपये २ हजार ३४ कोटी निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

कापूस खरेदी

१०. केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या आधारभूत किमतीवर राज्यात आपल्या यंत्रणेद्वारे कापूस खरेदीची योजना राबविण्यात येते. केंद्रीय योजना असूनही योजनेतील कापूस खरेदीसाठी महाराष्ट्र कापूस पणन महासंघाने घेतलेल्या रुपये १ हजार ८०० कोटी कर्जास राज्य शासनाने हमी दिली असून महासंघाद्वारे खरेदी करण्यात आलेल्या कापसाच्या मोबदल्यापोटी रुपये २ हजार ३६५ कोटी रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येत आहे.

सिंचन प्रकल्प

११. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता शाश्वत सिंचन हा प्रभावी उपाय आहे. राज्यामध्ये सद्य:स्थितीत ३१३ प्रकल्प अपूर्ण आहेत. प्रधानमंत्री कृषि सिंचाई योजनेत २६ तर बळीराजा जलसंजीवनी योजनेत ९१ प्रकल्पांचा समावेश आहे. अपूर्ण सिंचन प्रकल्पांचा प्राधान्यक्रम निश्चित करून ते कालबद्धरित्या पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

**जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभागासाठी सन २०२०-२१ मध्ये रुपये १० हजार २३५ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.**

मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना

१२. राज्यात विविध योजनांमधून जलसंधारणाची कामे करण्यात आली आहेत. मात्र त्यांच्या देखभाल व दुरुस्ती अभावी या योजनांमधून आवश्यक तेवढा जलसंचय होत नाही. अशा सुमारे ८ हजार जलसंधारण योजनांचे पुनरुज्जीवन केल्यास विकेंद्रीत जलसाठे निर्माण होतील, भूजल पातळीत वाढ होईल तसेच संरक्षित सिंचन क्षमता निर्माण होईल. त्यासाठी ‘मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना’ हा नवीन कार्यक्रम राबविण्याचे आम्ही ठरवले आहे.

**मृद व जलसंधारण विभागाकरिता रुपये २ हजार ८१० कोटी इतका नियतव्यय राखून ठेवला आहे.**

ठिबक सिंचन

१३. राज्यातील ऊस पिकाव्यतिरिक्त इतर पिकांकरिता ठिबक सिंचन बसविण्याकरिता अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ८० टक्के व बहुभूधारक शेतकऱ्यांना ७५ टक्के अनुदान देण्यात येते. ही योजना राज्यातील काही निवडक तालुक्यांमध्ये राबविण्यात येत होती. या योजनेचा विस्तार करण्यात येत असून ती आता राज्यात सर्वत्र लागू करण्यात येईल.

साखर कारखान्यांना सहभागी करून घेऊन शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनासाठी घेतलेल्या कर्जावर व्याज सवलत देऊन ऊसाखाली येणारी शेती येत्या ३ ते ४ वर्षात पूर्णपणे ठिबक सिंचनाखाली आणण्याचा राज्य शासनाचा मानस आहे.

शेतीपंपासाठी नवीन वीज जोडणी

१४. मागील दोन वर्षांपासून उर्वरित महाराष्ट्रात शेतीपंपासाठी नवीन वीजजोडणी देणे बंद आहे. शेती पंपासाठी नवीन वीजजोडणी देण्याची कार्यवाही आता सुरु करण्यात येत आहे. उच्चदाब वितरण प्रणाली योजनेअंतर्गत ग्राहकांच्या वीज भारानुसार कमी क्षमतेची रोहित्रे बसविली जातात. त्यावरून एक किंवा दोन

ग्राहकांना सर्व्हिस लाईनद्वारे वीज पुरवठा करण्यात येतो. ही योजना यापुढे आशियाई विकास बॅंकेच्या कर्जसहाय्यातून संपूर्ण राज्यासाठी लागू करण्यात येणार आहे.

**सौर कृषीपंप योजना**

१५. शेतीसाठी रात्री वीज पुरवठा करण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणी येतात. शेतीला दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी पुढील ५ वर्षात दरवर्षी १ लक्ष याप्रमाणे एकूण ५ लक्ष सौर कृषीपंप बसविण्यात येतील. अशी नवीन योजना राबविण्याचा शासनचा मानस आहे. या योजनेसाठी सुमारे रुपये १० हजार कोटी एवढा खर्च अपेक्षित असून तो येत्या ५ वर्षात अर्थसंकल्पाच्या व अन्य माध्यमातून उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मनोदय आहे. त्यासाठी सन २०२०-२१ मध्ये रुपये ६७० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

१६. देवी मंदिर, कोराडी परिसर, नागपूर येथे नाविन्यपूर्ण ऊर्जा पार्क तयार करण्याचे प्रस्तावित आहे.

१७. साकोली, जिल्हा भंडारा येथे नवीन कृषी महाविद्यालयाची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे.

**काजू विकास**

१८. कोकण विभागातील प्रमुख नगदी पीक असलेल्या काजू फळ पिकावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगाला चालना देण्याकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये १५ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.

**कोळंबी उत्पादन**

१९. राज्यात निमखारेपाणी क्षेत्रात कोळंबी उत्पादनास चालना देण्याची आवश्यकता आहे. कोळंबी प्रकल्पांसाठी शासकीय खाजण जमीन देण्याच्या सध्याच्या धोरणात बदल प्रस्तावित आहे. या क्षेत्रातील उद्योजकांना कोळंबी उत्पादनासाठी शासकीय खाजण जमीन सुलभरित्या उपलब्ध होईल, अशा पद्धतीने त्यात बदल करण्याचा शासनाचा विचार आहे.

**पिंजरा पद्धतीने मत्स्योत्पादनास प्रोत्साहन**

२०. सागरी, निमखारे पाणी व पिंजरा पद्धतीने गोड्या पाण्यात करावयाच्या मत्स्योत्पादनास चालना मिळावी, यासाठी केंद्र शासनाच्या योजनेतील जास्तीत जास्त निधी राज्यास उपलब्ध व्हावा यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन करण्यासाठी राज्य शासनाच्या ‘कामगिरीवर आधारित प्रोत्साहन’ या तत्त्वावर स्वतंत्र योजना सुरु करण्यात येईल.

**सन २०२०-२१ या वर्षात कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय या विभागास कार्यक्रमावरील बाबींवरील खर्चासाठी रुपये ३ हजार २५४ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

रेशीम उद्योगाला प्रोत्साहन

२१. राज्यातील रेशीम उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेत 'तुतीची लागवड' ही बाब समाविष्ट करण्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल. रेशीम कीटक संगोपनगृहाकरिता तसेच रुपये १ कोटी पर्यंतच्या रेशीम धागा मशिनरीकरिता अनुदान देण्यात येईल.

यंत्रमाग धारकांना प्रोत्साहन

२२. २७ अश्वशक्तीवरील यंत्रमाग धारकांना मिळणाऱ्या प्रतियुनिट वीजेच्या अनुदानात आणखी ७५ पैसे वाढ करुन ते एकूण अनुदान रुपये ४.१५ प्रती युनिट करण्यात येईल.

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग या विभागास रुपये ७ हजार ९९५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

**पायाभूत सुविधा**

सागरी महामार्गाचे बांधकाम

२३. कोकणचा विकास आमच्या सरकारसाठी प्राधान्याचा विषय आहे. कोकणाची अर्थव्यवस्था फळबाग विकास, पर्यटन आणि मत्स्यव्यवसाय या बाबींवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. दळणवळणाची आवश्यकता म्हणून कोकणासाठी सागरी महामार्गाचे नियोजन करण्यात आले असले तरी या महामार्गास अद्याप मूर्त स्वरुप देण्यात आलेले नाही.

रेवस ते रेड्डी हा सागरी महामार्ग अद्यापही अविकसित आहे. या महामार्गावरील बाणकोट, केळशी, दाभोळ व जयगड येथे खाडीवर पूल बांधून या संपूर्ण महामार्गाचे काँक्रिटीकरण करण्यात येईल. यासाठी अंदाजे तीन हजार पाचशे कोटींची आवश्यकता आहे. येत्या तीन वर्षात हे काम पूर्णत्वास नेण्याचा आमच्या

सरकारचा निश्चय आहे. हे काम महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत कालबद्ध पद्धतीने करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**पुणे रिंगरोड**

२४. नाशिक, औरंगाबाद, हैद्राबाद, बेंगळूरु व मुंबई शहरातून येणारी वाहतूक पुणे शहराबाहेरुन वळविण्यासाठी १७० कि.मी. लांबीचा रिंगरोड प्रस्तावित आहे. त्यासाठी भूसंपादनासह रुपये १५ हजार कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. यावर्षी भूसंपादन सुरु करुन येत्या ४ वर्षात हा रस्ता महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत पूर्ण करण्यात येईल.

**हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग**

२५. हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग योजनेचा योग्य आर्थिक ताळेबंद (Financial closure) मागील शासनाच्या काळात होऊ शकला नव्हता. या शासनाने स्वत:च्या निधीतून अतिरिक्त रुपये ८ हजार ५०० कोटी प्रकल्पाच्या भागभांडवलासाठी उपलब्ध करून दिल्याने प्रकल्पाच्या व्याजातील रकमेमध्ये रुपये अडीच हजार कोटी पर्यंत बचत होईल. तसेच प्रकल्पाची वित्तीय जोखीमही कमी झाली आहे. या महामार्गावर २० ठिकाणी कृषी समृद्धी केंद्रे निर्माण करण्याचा निर्णय झाला असून आगामी वर्षात त्यापैकी ४ कृषी समृद्धी केंद्रे मूर्त स्वरुपात येतील.

**नागरी सडक विकास योजना**

२६. नागरी भागातील विकासासाठी मी नवीन योजना जाहीर करीत आहे. राज्यात महानगरपालिका, नगरपालिका वा नगरपंचायत असलेल्या अनेक शहरातील मुख्य बाजारपेठेचा रस्ता अरुंद असून नागरिकांसाठी व वाहतुकीसाठीही गैरसोईचा ठरतो आहे. या रस्त्यांवर दोन्ही बाजूस विद्युत तारांचे जाळे पसरले असून सांडपाणी व्यवस्था व पदपथही नाहीत. या सर्व शहरांतील मुख्य बाजारपेठेच्या रस्त्यांची दर्जोन्नती, रुंदीकरण व सुशोभीकरण करण्यासाठी ‘नागरी सडक योजना’ ही नवीन योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये १ हजार कोटी इतका निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

**पुणे, पिंपरी-चिंचवड मेट्रो**

२७. पुणे-पिंपरी चिंचवड मेट्रो अंतर्गत माण-हिंजेवाडी ते शिवाजीनगर या मार्गिके व्यतिरिक्त शिवाजीनगर ते शेवाळेवाडी व माण ते पिरंगुट या दोन नवीन मार्गिका सुरु करण्यात येणार आहेत. वनाज ते रामवाडी या मेट्रो लाईनचे

विस्तारीकरण करुन वनाज ते चांदणी चौक व रामवाडी ते वाघोली तसेच पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गिकांची लांबी वाढवून स्वारगेट ते कात्रज व पिंपरी चिंचवड ते निगडी असे विस्तारीकरण करण्याची योजना आहे. पुणे मेट्रोसाठी गेल्या ५ वर्षात जेवढा निधी देण्यात आला, त्यापेक्षाही जास्त निधी या वर्षी देण्यात येईल.

**राज्यातील मेट्रोच्या कामाकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये १ हजार ६५७ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.**

ग्रामीण सडक विकास योजना

२८. शहरी भागाच्या विकासाप्रमाणे ग्रामीण भागाच्या विकासासाठी महत्त्वाचे अशी ग्रामीण सडक विकास योजना मी जाहीर करीत आहे. ग्रामीण भागातील रस्ते विकासाची ४० हजार कि.मी. लांबीची कामे हाती घेऊन ती सन २०२०-२०२४ या कालावधीत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. सन २०२०-२१ मध्ये या योजनेसाठी रुपये १ हजार ५०१ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

राष्ट्रीय जलमार्ग योजना

२९. वसई-ठाणे-कल्याण या जलमार्गावर मीरा-भाईंदर ते डोंबिवली अशी प्रवासी वाहतूक सुरु करण्याकरिता रुपये ८६ कोटी खर्चास तत्त्वत: मान्यता देण्यात आली आहे.

जेट्टीचे बांधकाम

३०. सागरमाला कार्यक्रमांतर्गत प्रवासी जलवाहतुकीसाठी तसेच पर्यटकांकरिता रेडिओ क्लब, कुलाबा येथे जेट्टीच्या बांधकामाकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये ५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

रो-रो सेवा

३१. सागरमाला कार्यक्रमातंर्गत किनारपट्टीवरील बंदरामध्ये प्रवासी जलवाहतुकीसाठी वसई, भाईंदर, खारवाडेश्वरी, मनोरी, घोडबंदर, नारंगी, मालवण, बोरीवली, गोराई व आंबडवे येथे रो-रो सेवेसाठी जेट्टी बांधण्याचे काम प्रगतीपथावर असून या कामाकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये ६५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात बंदरे विकास या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २७६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

मा. बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजना

३२. राज्यातील एकूण २८,००६ ग्रामपंचायतींपैकी जवळपास ४,२५२ ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही. १०७४ ग्रामपंचायतींना सन २०२०-२१ मध्ये इमारत बांधणीकरिता रुपये १५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे. राज्यातील सर्वच ग्रामपंचायतींना सन २०२४ पर्यंत स्वतःचे कार्यालय असेल आणि त्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून दिला जाईल.

**सन २०२०-२१ या वर्षात सार्वजनिक बांधकाम विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये १० हजार ६५० कोटी, नगरविकास विभागास रुपये ६ हजार २५ कोटी व ग्रामविकास विभागास रुपये ५ हजार ८७७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

विमानतळाचा विकास

३३. राज्यातील कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, अकोला व अमरावती या जिल्ह्यात सुरु असलेल्या विमानतळ विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. शिवाय, सोलापूर व पुणे येथे नवीन विमानतळ उभारण्यात येतील. त्याकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये ७८ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

बसखरेदी व बस स्थानकांच्या बांधकामाकरिता राज्य परिवहन महामंडळास सहाय्य

३४. ग्रामीण भागातील जनतेस आरामदायी व सुविधादायक प्रवास उपलब्ध करून देण्यासाठी महामंडळाच्या ताफ्यातील जुन्या बस बदलून त्याऐवजी अत्याधुनिक सुविधा असलेल्या वायफाययुक्त बस ग्रामीण जनतेला प्रवासासाठी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. कमी अंतराच्या प्रवासासाठी अत्याधुनिक सुविधा असलेल्या दर्जेदार मिनी बस खरेदी करण्याचेही प्रस्तावित आहे. येत्या काळात महामंडळाच्या ताफ्यातील सर्व जुन्या बस बदलून त्याऐवजी नवीन बस देण्याचा शासनाचा मानस आहे. ग्रामीण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थीनींना त्यांच्या वेळापत्रकानुसार ये-जा करण्यासाठी गरजेनुरुप मार्ग व्यवस्थापन व समय व्यवस्थापन करण्याचेही ठरविण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बस ताफ्यामधील जुन्या बस बदलून सुमारे १६०० नवीन बस विकत घेण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बसस्थानके आत्याधुनिक करण्यासाठी महामंडळास रुपये ४०१ कोटी देण्याचे प्रस्तावित आहे.

**बेंगळुरु-मुंबई आर्थिक मार्गिका**

३५. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉरच्या धर्तीवर बेंगळुरु-मुंबई आर्थिक कॉरीडॉर (BMEC) अंतर्गत सातारा जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. त्याचा फायदा साताऱ्याबरोबरच शेजारील सांगली व सोलापूर या जिल्ह्यांनाही होईल. या प्रकल्पासाठी रुपये ४ हजार कोटी खर्च अपेक्षित आहे.

**शासकीय मुद्रणालयाचे आधुनिकीकरण**

३६. शासकीय मुद्रणालयामध्ये काळानुरुप व बदलत्या नवीन तंत्रज्ञानानुसार अद्ययावत यंत्रसामग्री विकत घेणे व नूतनीकरण करणे यासाठी सन २०२०-२१ या वर्षात रुपये २५ कोटी नियतव्यय प्रस्तावित केला आहे.

**आरोग्य सेवा**

राज्यात आरोग्य संस्थांच्या १८७ इमारतींची बांधकामे किंवा विशेष दुरुस्त्या वर्षानुवर्षे रखडलेल्या आहेत. आमचे शासन एक धडक मोहीम घेऊन सर्व अपूर्ण कामे पुढील तीन वर्षात पूर्ण करणार आहे.

राज्यात ११ जिल्हा रुग्णालये, २१ स्त्री रुग्णालये, २१ उपजिल्हा रुग्णालये, ६०३ प्राथमिक आरोग्य केंद्रे व ६,१०५ उपकेंद्रे यांची कमतरता आहे. या आरोग्य संस्थाची कमतरता नियोजनबद्ध कार्यक्रमाद्वारे येत्या पाच वर्षात दूर करण्याचे शासनाचे ध्येय आहे.

पुरेशा डॉक्टरांची सेवा उपलब्ध होण्यासाठी उपलब्ध असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशक्षमतेमध्ये वाढ करणे आणि नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालये मंजूर करणे आवश्यक आहे. अतिदुर्गम व दुर्गम भागातील आरोग्य संस्थांमध्ये आरोग्य सेवा देण्यासाठी वैद्यकीय अधिकारी आणि विशेषज्ञांना प्रोत्साहन देणेही आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करुन राज्य शासनाने सार्वजनिक प्राथमिक आरोग्य सेवेसाठी रुपये ५ हजार कोटी आणि वैद्यकीय शिक्षणाकरिता

रुपये २ हजार ५०० कोटीचे बाह्यसहाय्यित प्रकल्प हाती घेण्याचे ठरविले असून त्यास संबंधित बहुराष्ट्रीय वित्तीय संस्थेने तत्त्वत: मान्यता दिली आहे.

**डायलेसिस केंद्रात वाढ करणे**

३७. सद्य:स्थितीत राज्यामध्ये ३३ डायलेसिस केंद्रे कार्यरत असून आणखी २० केंद्रे कार्यान्वित होत आहेत. डायलेसिस आवश्यक असणाऱ्या कोणत्याही रुग्णाला राज्यात ५० कि.मी. पेक्षा जास्त अंतराचा प्रवास करावा लागू नये, यादृष्टीने प्रत्येक २ ते ३ तालुक्यांत एक असे प्रमाण ठरवून राज्यात नवीन ७५ डायलेसिस केंद्रे स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

**प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामीण रुग्णालयाकरिता नवीन रुग्णवाहिका खरेदी करणे**

३८. राज्यातील आरोग्य संस्थांकडील जुन्या झालेल्या १०२ क्रमांकाच्या रुग्णवाहिका २ वर्षात पूर्णत: बदलण्याचे शासनाने ठरविले आहे. यावर्षी ५०० नवीन रुग्णवाहिका खरेदी करण्याकरिता रुपये २५ कोटी इतका निधी प्रस्तावित आहे.

**महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना**

३९. महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत रुग्णालयांची संख्या ४९३ वरुन १ हजार एवढी वाढविण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत फारशा वापरल्या न जाणाऱ्या १२७ उपचारांना कमी करुन नव्याने १५२ उपचार प्रकारांचा समावेश करण्यात आला आहे. त्यात गुडघा व खुबा बदलाच्या शस्त्रक्रियेचाही (नी ॲन्ड हिप रिप्लेसमेन्ट) समावेश आहे. त्यामुळे, या योजनेअंतर्गत आता एकूण ९९६ प्रकारचे उपचार उपलब्ध होतील. राज्यातील ४ आकांक्षित व आदिवासी जिल्ह्यांमध्ये वैद्यकीय आस्थापनांना एक श्रेणी वाढ करुन वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती केली जाईल. या योजनेसाठी सन २०२०-२१ मध्ये ५१५ कोटी तरतूद प्रस्तावित आहे.

**दीर्घकाळ उपचार चालणाऱ्या रुग्णांना औषधोपचारामध्ये मदत**

४०. राज्यात पॅलेएटिव्ह केअरची आवश्यकता असणारे सुमारे १० लक्ष रुग्ण आहेत. पॅलेएटिव्ह केअरसंबंधी नवीन धोरण निश्चित करण्यात येईल. त्यासाठीच्या धोरणामध्ये सामाजिक व सेवाभावी संस्था तसेच शासकीय वैद्यकीय आस्थापनांना सामावून घेण्याचा विचार करण्यात येईल.

गुटखा बंदी

४१. गुटखा, पान मसाला व इतर तत्सम पदार्थामुळे मुखाचा कर्करोग, अन्ननलिका व पोटाचा कर्करोग तसेच जठर, आतडी व श्वसनासंबंधी आजारांचा प्रादुर्भाव वाढत चालला आहे. तरुणांमध्ये वाढत असलेली व्यसनाधीनता लक्षात घेता, प्रतिबंधक कायद्याची कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश संबंधित शासकीय यंत्रणांना देण्यात आले आहेत.

रुग्णालयांचे श्रेणीवर्धन

४२. पाटण, जि. सातारा येथील ग्रामीण रुग्णालय तसेच साकोली, जि. भंडारा येथील उपजिल्हा रुग्णालयांचे १०० खाटांच्या रुग्णालयामध्ये रुपांतर करण्यात येणार आहे.

नवीन वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना

४३. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षापासून नंदूरबार येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि सातारा, अलिबाग व अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सन २०२१-२२ पासून सुरु करण्याचे नियोजन आहे. सन २०२०-२०२१ करिता शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या ११८ जागा वाढविण्यात येणार आहेत.

**सन २०२०-२१ या वर्षात सार्वजनिक आरोग्य विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २ हजार ४५६ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण आणि औषधीद्रव्ये या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये ९५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## मनुष्यबळ विकास

**शालेय शिक्षण—** वाबळेवाडी, तालुका शिरुर, जि. पुणे ही जिल्हा परिषदेची शाळा उच्च दर्जाची शाळा म्हणून नावारुपास आली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील सर्व शाळा ‘आदर्श शाळा’ करण्याचा शासनाचा मानस आहे. पुढील ४ वर्षात प्रत्येक तालुक्यात किमान ४ आदर्श शाळा अशा राज्यात एकूण १५०० शाळांना आदर्श शाळा म्हणून नावारुपास आणले जाईल. शासकीय शाळांमध्ये मुलभूत सोयीसुविधांसह गुणवत्तावाढीकरीता स्टेट ऑफ द आर्ट अध्ययन सुविधा, स्मार्ट क्लासरुम्स, सुसज्ज वाचनालय, अत्याधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडा सुविधा,

इंटरनेट कनेक्टिव्हिटीयुक्त शालेय संकुल तयार करण्याचे शासनाने ठरविले आहे. हा प्रकल्प तसेच शिक्षकांचे प्रशिक्षण व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अंदाजे रुपये ५ हजार कोटी किमतीचा बाह्यसहाय्यित प्रकल्प राबविण्याचे शासनाने ठरविले आहे.

**महाराष्ट्र कर्नाटक सीमावर्ती भागातील मराठी शाळांना आर्थिक सहाय्य**

४४. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील ज्या मराठी बांधवांनी मराठी माध्यमांच्या शाळा नेटाने चालविल्या आहेत, त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आपले कर्तव्य समजून या शाळांना आर्थिक मदत व्हावी यासाठी विशेष बाब म्हणून रुपये १० कोटी एवढे सहाय्य करण्यात येईल. तसेच कर्नाटकात मराठी भाषिक वर्तमानपत्रांना सहाय्यभूत ठरावे म्हणून मराठी वर्तमानपत्रात जाहिराती देण्यात येतील.

**रयत शिक्षण संस्थेला सहायक अनुदान**

४५. रयत शिक्षण संस्थेच्या शतक महोत्सवी वर्षानिमित्त सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रुपये ११ कोटी अनुदान देण्यात येईल.

**विद्यार्थीनीना स्वसंरक्षण प्रशिक्षण योजना**

४६. शालेय विद्यार्थीनींना स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी, शालेय व्यवस्थापन समितीमार्फत प्रशिक्षण योजना राबविण्यात येईल.

**विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा वाढविणे**

४७. तालुका क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा रुपये १ कोटी वरून रुपये ५ कोटी एवढी वाढविण्यात येत आहे. तसेच जिल्हा क्रीडा संकुलांची अनुदान मर्यादा रुपये ८ कोटी वरून रुपये २५ कोटी आणि विभागीय क्रीडा संकुलाची अनुदान मर्यादा रुपये २४ कोटी वरून रुपये ५० कोटी इतकी वाढविण्याचे प्रस्तावित आहे.

**आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा विद्यापीठाची स्थापना**

४८. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी, पुणे येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

ऑलिंपिक भवन

४९. ऑलिंपिक स्पर्धांमध्ये राज्यातील खेळाडूंनी उत्तम कामगिरी करण्याकरिता पुणे येथे ऑलिंपिक भवन बांधण्याचे प्रस्तावित आहे.

ज्युनियर विश्वचषक फुटबॉल स्पर्धा

५०. आंतरराष्ट्रीय फुटबॉल फेडरेशन (FIFA) व भारतीय फुटबॉल फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नोव्हेंबर, २०२० मध्ये नवी मुंबई येथे होणाऱ्या ज्युनिअर विश्वचषक स्पर्धांसाठी शासनाकडून आवश्यक ते अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल.

क्रीडा स्पर्धांच्या अनुदानात वाढ

५१. राज्यात छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी व व्हॉलीबॉल स्पर्धा, स्व. खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा व कै. भाई नेरुरकर चषक खो-खो स्पर्धा या महत्त्वाच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धांच्या अनुदानात रुपये ५० लक्षवरुन रुपये पाऊण कोटी इतकी वाढ करण्याचे प्रस्तावित आहे.

मिनी ऑलिंपिक स्पर्धा

५२. विविध खेळांना उत्तेजन देण्यासाठी व खेळाडूंना स्पर्धात्मक अनुभव मिळावा यासाठी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या सहकार्याने मिनी ऑलिंपिक स्पर्धा आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे. याचा लाभ दिव्यांग खेळाडूंच्या क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देण्यास देखील होईल.

**सन २०२०-२१ या वर्षात शालेय शिक्षण व क्रीडा या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २ हजार ५२५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

ग्रंथ संग्रहालयास अनुदान

५३. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय या संस्थेस १२५ वर्षे पूर्ण झाली आहेत. दुर्मिळ ग्रंथ व हस्तलिखितांचे डिजिटायझेशन करण्यासाठी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयास रुपये ५ कोटी विशेष अनुदान देण्यात येईल. एशियाटिक सोसायटीलाही यासाठी विशेष अनुदान दिले जाईल.

उत्कृष्टता केंद्र (सेंटर फॉर एक्सलन्स) स्थापन करणे

५४. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, पुणे, तसेच शासकीय औषध निर्माणशास्त्र महाविद्यालय, रत्नागिरी, कऱ्हाड, औरंगाबाद आणि शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, रत्नागिरी, पुणे, नागपूर येथील शासकीय संस्थांमध्ये १२ उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात उच्च व तंत्र शिक्षण या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये १ हजार ३०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

**कौशल्य विकास व रोजगार**

महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजना

५५. आर्थिक मंदीच्या सावटाखाली बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. अशा परिस्थितीत राज्यातील युवक-युवतींना रोजगारक्षम करून प्रत्येक हाताला काम देणे हे शासनाचे ध्येय आहे. राज्यातील किमान १० वी उत्तीर्ण झालेल्या युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी व अनुभव उपलब्ध करून देण्यासाठी नवीन महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी योजना कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे. या योजनेमुळे शिकाऊ उमेदवार भरतीसाठी आस्थापनांना प्रोत्साहन मिळून पाच वर्षात १० लक्ष सुशिक्षित बेरोजगार तरुण प्रशिक्षित होतील. त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधीही उपलब्ध होतील.

उद्योगांना आवश्यक असलेले कुशल मनुष्यबळ तयार करणे ही सध्याची गरज आहे. बदलत्या काळानुसार पारंपरिक उद्योगासोबतच नवनवीन उद्योग व सेवा क्षेत्रे उदयास आली आहेत. ई-कॉमर्स, कॉल सेंटर, पर्यटन, हॉस्पिटॅलिटी, फिन्टेक, टेलिकॉम, टेक्स्टाईल आदींचा समावेश त्यात आहे. राज्यातील युवक-युवतींना या क्षेत्रासाठी प्रशिक्षण देऊन नवीन उद्योगांमध्ये रोजगारक्षम बनविणे ही काळाची गरज आहे.

या योजनेची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

- ही योजना २१ ते २८ वयोगटातील सुशिक्षित बेरोजगारांसाठी लागू करण्यात येईल.

- शासकीय/निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ मधील तरतुदीनुसार पारंपरिक व नवीन उद्योगक्षेत्रांमध्ये उमेदवारांना ठराविक कालावधीसाठी प्रशिक्षण देण्यात येईल.

● महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेंतर्गत दरमहा प्रति शिकाऊ उमेदवार देय विद्यावेतनाच्या ७५ टक्के किंवा रुपये ५,००० यापैकी कमी असलेली रक्कम खाजगी आस्थापनांना अदा करण्यात येईल. त्यासाठी प्रति उमेदवार रुपये ६० हजार इतका वार्षिक खर्च करण्यात येईल.

● महाराष्ट्र शिकाऊ उमेदवारी प्रोत्साहन योजनेत राज्य शासकीय/निमशासकीय आस्थापनांसाठी शासनाकडून १०० टक्के विद्यावेतन देण्यात येईल.

● या योजनेच्या सुलभ पण प्रभावी, जलद परंतु पारदर्शक अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी नवीन संकेतस्थळ तयार करण्यात येईल.

● या योजनेकरिता आगामी ५ वर्षांसाठी रुपये ६ हजार कोटी इतका अंदाजित खर्च आहे.

● ही योजना दिनांक १५ ऑगस्ट २०२० पासून सुरु करण्यात येईल.

**स्थानिकांना रोजगारांसाठी आरक्षण कायदा करणे**

५६. महाराष्ट्रात नवीन उद्योग यावेत यासाठी हे शासन प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर स्थानिक उमेदवारांना नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळावे हे शासनाचे धोरण आहे. या धोरणातील त्रुटी दूर करुन त्या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्वसमावेशक कायदा करण्याचा शासनाचा मानस आहे.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण**

५७. सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या दर्जात वाढ करून जागतिक दर्जाच्या आधुनिक कौशल्य केंद्रात रुपांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी खाजगी क्षेत्रातील उद्योजकांकडून सुमारे रुपये १२ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे. राज्य शासनाकडून त्यासाठी आगामी ३ वर्षात रुपये १ हजार ५०० कोटी उपलब्ध करून देण्यात येतील.

**अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाकडून शैक्षणिक कर्ज उपलब्ध करणे**

५८. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत उद्योगाकरिता कर्ज उपलब्ध करून देण्यात येते. मात्र, आर्थिकदृष्ट्या मागास संवर्गातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात पैशाअभावी खंड पडू नये यासाठी आता महामंडळामार्फत शैक्षणिक कर्जही उपलब्ध करून देण्यात येईल. सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात रुपये ५० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

५९. राज्यातील युवक-युवतींना आत्मनिर्भर करण्यासाठी त्यांच्या रोजगार व स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देणारा ‘मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम’ राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत नव उद्योजकांना स्वयंरोजगार प्रकल्प राबविण्यासाठी राज्य शासनामार्फत १५ ते ३५ टक्के अनुदान देण्यात येते. स्वयंरोजगाराच्या माध्यमातून पुढील ५ वर्षांत १ लाख उद्योग घटक स्थापित होऊन त्याद्वारे प्रतिवर्ष दिड ते दोन लाख रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. सन २०२०-२१ या वर्षात या बाबीकरिता रुपये १३० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात कौशल्य विकास व उद्योजकता या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये ५०१ कोटी, उद्योग, ऊर्जा व कामगार या विभागास रुपये ८ हजार ५४७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## महिला व बालविकास

लिंगभाव व बाल अर्थसंकल्प

६०. राज्यातील लोकसंख्येमध्ये ६० टक्क्यांहून अधिक असलेल्या महिला व बालकांसाठी लिंगभाव व बाल अर्थसंकल्प (Gender and Child Budget) यावर्षी प्रथमच सादर करण्याचे प्रस्तावित आहे. शासनाच्या उपाययोजनांचा महिला, तृतीयपंथी व बालकांना होणाऱ्या लाभाचे व संबंधित योजनांचे त्यातून सातत्याने मूल्यमापन करता येणार आहे.

महिला बचत गटाकडून खरेदी

६१. राज्यातील महिला बचत गटाच्या चळवळीस गतीमान करून महिलांना रोजगार व्यवसायाच्या संधी वाढण्यासाठी राज्य शासन कटीबद्ध आहे. राज्य शासनामार्फत करावयाच्या एकूण खरेदीतील सुमारे रुपये १ हजार कोटी पर्यंतची खरेदी प्राधान्याने महिला बचत गटाकडून करण्याबाबत शासन गांभिर्याने विचार करत आहे. यासाठी शासनाच्या निर्णयानंतर खरेदी धोरणात आवश्यक सुधारणा करण्याचा मानस आहे.

महिला सुरक्षा

६२. महिला सुरक्षा ही सर्वोच्च प्राधान्याची बाब आहे. महिलांवर अत्याचाराच्या घटना घडू नयेत, यासाठी प्रतिबंधात्मक योजना राबविण्याबाबत शासन कटीबद्ध आहे. महिला आयोगाचे कार्यालय राज्यात प्रत्येक विभागीय आयुक्त स्तरांवर स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे.

६३. प्रत्येक जिल्ह्याच्या मुख्यालयात एक महिला पोलीस ठाणे स्थापन करण्यात येईल. या पोलीस ठाण्यामध्ये सर्व अधिकारी, कर्मचारी महिलाच असतील. या पोलीस ठाण्यामध्ये जिल्ह्यातील कोणत्याही महिलेस तक्रार करता येईल. महिलांवरील अत्याचाराच्या तक्रारीसंदर्भात तपास करण्यासाठी ‘विशेष तपास पथक’ निर्माण करण्यात येईल.

६४. महिलांवरील अत्याचाराच्या खटल्यांमध्ये न्यायालयात शासनाची बाजू मांडण्यासाठी महिला शासकीय अभियोक्त्याची नियुक्ती करण्यात येईल.

६५. महिलांवर अत्याचार घडू नयेत, दुर्दैवाने घडलाच तर गुन्हेगारांवर वचक राहावा, तसेच पुढे जलद न्यायाकरिता कडक कायदा करण्याची शक्यता अजमावण्यात येत आहे.

६६. राज्यातील ग्रामीण भागातील महिला व किशोरवयीन मुलींमध्ये वैयक्तिक स्वच्छतेसंदर्भात जाणीव जागृती निर्माण करण्याकरिता सर्व माध्यमिक शाळांतील किशोरवयीन मुलींना माफक दरात दर्जेदार सॅनिटरी नॅपकीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. वापरलेल्या सॅनिटरी नॅपकीनची विल्हेवाट लावण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांमध्ये यंत्रे (Incinerator) बसवण्याचे नियोजन आहे. सन २०२०-२१ या वर्षात याकरिता रुपये १५० कोटी उपलब्ध करून देण्यात येतील.

मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे

६७. ‘अध्यात्म और विज्ञान के संयोग से सब हो सुखी’ या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचाराला स्मरुन गुरुकुंज मोझरी, ता. तिवसा, जि. अमरावती येथे ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज राज्यस्तरीय प्रशिक्षण प्रबोधिनी’ स्थापन करण्यात येईल, ज्यामध्ये महिला बालकल्याण, समाजकल्याण व इतर सामाजिक विकास विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यात येईल.

पोषण आहार योजना

६८. एकात्मिक बाल विकास सेवा योजना, शालेय शिक्षण विभागामार्फत शासकीय व अनुदानित शाळांमधील इयत्ता आठवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना पोषण आहार तसेच आदिवासी विकास विभागामार्फत ‘भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार’ योजनेअंतर्गत पोषण आहार देण्यात येतो. या योजनांसाठी अनुक्रमे रुपये १ हजार २१२ कोटी, रुपये ६०० कोटी व रुपये २०४ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित आहे. या योजनांमध्ये पारदर्शकता आणुन योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात महिला व बालविकास या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २ हजार ११० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

शिवभोजन थाळी

६९. अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत सहा महानगरपालिका क्षेत्रात प्रायोगिक तत्त्वावर ‘१० रुपयांमध्ये थाळी’ (भोजन) उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेत प्रत्येक केंद्रावर रोज ५०० जणांना भोजन उपलब्ध करुन देण्याचे नियोजन आहे. योजनेतील लाभार्थ्यांची संख्या दुप्पट करण्याचे प्रस्तावित असून या योजनेचा इष्टांक दररोज १ लक्ष थाळी एवढा करण्यासाठी सन २०२०-२१ या वर्षात रुपये १५० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये ३०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## पाणीपुरवठा व स्वच्छता

मराठवाडा वॉटर ग्रीड

७०. मराठवाडा विभागातील सततच्या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी मराठवाडा वॉटर ग्रीडची आखणी करण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात उस्मानाबाद, लातूर व औरंगाबाद जिल्ह्यातील अधिक टंचाईग्रस्त काही तालुक्यांसाठी उजनी तथा जायकवाडी धरणातून प्रकल्प अंमलबजावणी नियोजित आहे. त्याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये २०० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

जलजीवन मिशन

७१. देशातील सर्व घरांना सन २०२४ पर्यंत नळाद्वारे पाणीपुरवठा करण्याच्या उद्देशाने यापुर्वी सुरु केलेला ‘राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम’ पुनर्रचित करुन तो ‘जलजीवन मिशन’ या नवीन कार्यक्रमांतर्गत अंतर्भूत केला आहे. राज्यातील एकूण १०,००० नवीन पाणीपुरवठा योजनांचा समावेश या अभियानांतर्गत करण्यात येणार आहे. याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये १ हजार २३० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सन २०२०-२१ या वर्षात पाणीपुरवठा व स्वच्छता या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २ हजार ४२ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## इमारत बांधकामे

मराठी भाषा भवन

७२. मराठी भाषेचा विकास, प्रचार व प्रसिद्धीकरिता मुंबई येथे मराठी भाषा भवन बांधण्याचे प्रस्तावित आहे.

वस्तु व सेवाकर भवन

७३. वस्तू व सेवाकर भवन, अप्रत्यक्ष कर संशोधन संस्था आणि लेखा व कोषागारे विभागाच्या प्रशिक्षण केंद्रासाठी मुंबईत वडाळा येथे ‘वस्तू व सेवाकर भवन’ बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये ११८.१६ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

विभागासाठी राज्यस्तरीय कार्यालयीन इमारतीचे बांधकाम

७४. मुंबई येथे ‘राज्य उत्पादन शुल्क भवन’ बांधण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी सन २०२०-२१ या वर्षात रुपये १७.५० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**नवी मुंबई येथे महाराष्ट्र भवन उभारणे**

७५. महाराष्ट्राच्या विविध भागातून नागरिक कामानिमित्त मुंबईत येत असतात. त्यांच्या निवासाची सोय व्हावी म्हणून नवी मुंबईतील वाशी येथे आरक्षित भूखंडावर सिडकोकडून 'महाराष्ट्र भवन' उभारण्याचे प्रस्तावित आहे.

**न्यायालयीन इमारती व निवासस्थाने बांधकाम**

७६. राज्यातील विविध ठिकाणी न्यायालयीन इमारती व निवासस्थाने बांधण्याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये ९११ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

## पर्यावरण व वने

७७. 'ग्लोबल वॉर्मिंग' आणि 'क्लायमेट चेंज' हे विषय सध्या गंभीर वळणावर आहेत. पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे निसर्गाकडून वातावरण बदलाचे संकेत मिळत आहेत. वातावरणीय बदलामुळे जलदगतीने तापमानात वाढ होत आहे. त्याचा परिणाम निसर्गावर होतो आहे. हे दुष्परिणाम टाळण्यासाठी वनक्षेत्र वाढविणे, सौर ऊर्जा तसेच पवन उर्जेचा वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, कृषि क्षेत्रात नवीन जातींवर संशोधन करून अनपेक्षित तापमान बदलास बळी न पडणाऱ्या पिकांच्या जातींचा प्रसार करणे या व अशा अनेक उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. याकरिता विशेष समर्पित निधीची तरतूद आतापासूनच करणे आवश्यक आहे. त्याबाबत मी अर्थसंकल्पीय भाषणाच्या भाग दोनमध्ये भाष्य करणार आहे.

**नदी कृती आराखडा**

७८. नदी प्रदूषण प्रतिबंध प्रकल्पाच्या अनुषंगाने नाग, इंद्रायणी व वालधुनी या नद्यांमध्ये सोडण्यात येणारे सांडपाणी अडविणे, प्रक्रिया करणे, सांडपाणी प्रक्रिया केंद्र स्थापन करणे, सुलभ शौचालय बांधणे आदींसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल.

**सन २०२०-२१ या वर्षात पर्यावरण विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये २३० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

वृक्ष लागवड ७९. मागील पाच वर्षात ५० कोटी वृक्ष लागवडीचा दावा करण्यात आला आहे. या वृक्षांचे संगोपन व संवर्धन करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. त्यामुळे, या योजनेच्या फलनिष्पत्तीचा आढावा घेऊन नवीन वृक्ष लागवडीचे नियोजन करण्यात येईल.

**सन २०२०-२१ या वर्षात वन विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये १ हजार ६३० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

## पर्यटन विकास

वरळी, मुंबई येथे दुग्धशाळेच्या जागेत आंतरराष्ट्रीय स्तराचे पर्यटन संकुल

८०. वरळी दुग्धालयाच्या १४ एकर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन संकुलाची निर्मिती करण्यात येईल. या प्रकल्पासाठी जागतिक स्तरावरील पर्यटन सल्लागाराची नेमणूक करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येईल. त्यात आंतरराष्ट्रीय दर्जाच्या एका आकर्षक मत्स्यालयाचाही समावेश असेल. या प्रकल्पाची अंदाजित किंमत सुमारे रुपये १ हजार कोटी आहे.

पर्यटन ८१. मुंबईमध्ये देश-विदेशातील पर्यटकांना आकर्षित करण्याकरिता मुंबईतील विविध पर्यटन विकास कामासाठी सन २०१९-२० मध्ये रुपये १०० कोटी नियतव्यय देण्यात आला होता. यापुढेही दरवर्षी १०० कोटीप्रमाणे येत्या ५ वर्षासाठी रुपये ५०० कोटी एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. मुंबईतील हाजी अली परिसराचा विकास आराखडाही तयार करण्यात येईल. तसेच सागरी किनारी पर्यटन विकासाकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर प्रकल्प तफावत निधी उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे.

पर्यटन अभ्यासक्रम

८२. पर्यटन व्यवसायासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याकरिता महाविद्यालयांमध्ये पर्यटन व हॉस्पिटॅलिटी पदविका व पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याचा मानस आहे.

लोणार सरोवर विकास

८३. उल्कापातातून निर्माण झालेले लोणार सरोवर व परिसराच्या विकासाकरिता आराखडा मंजूर असून आराखडयात प्रस्तावित असलेली कामे करण्याकरिता आवश्यक नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात येईल.

अचलपूर, जि. अमरावती शहराचा विकास

८४. प्रबोधनकार ठाकरे आणि विख्यात साहित्यिक राम शेवाळकर यांच्याशी संबंधित अचलपूर या शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आराखडा तयार करण्यात येईल.

इतर पर्यटन स्थळे

८५. राज्यातील मुरुड जंजिरा समुद्रकिनारा सुशोभिकरण, औरंगाबाद येथील तीन पुरातन पुलांचे नूतनीकरण व बळकटीकरण, पाटण तालुक्यातील तीनधारी धबधबा, रामघळ धबधबा, घाटमाता ते हुंबरळी वॉकींग ट्रॅक, जंगली जायगड येथील वॉकींग ट्रॅक, केमसे नाका वॉकींग ट्रॅक, सज्जनगड ते परळी रोपवे, शिवनेरी किल्ला पर्यटन विकास, माचाळ (जि. रत्नागिरी), नरनाळा किल्ला (जि. अकोला), श्री अंबाबाई तीर्थक्षेत्र (जि. कोल्हापूर) या पर्यटन स्थळांचा विकास करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. राज्यातील थंड हवेची ठिकाणे, समुद्रकिनारे व पर्यटनस्थळी पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या उपाययोजना आणि पर्यटनाच्यादृष्टीने सोयीसुविधा करण्यात येतील.

**सन २०२०-२१ या वर्षात पर्यटन व सांस्कृतिक कार्य या विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये १ हजार ४०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

**नियोजन**

आमदार स्थानिक विकास निधी

८६. आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सर्व विधीमंडळ सदस्यांना मतदारसंघातील विकास कामे करण्यासाठी दरवर्षी विधीमंडळ सदस्य निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. सन २०११ मध्ये या निधीत रुपये १.५ कोटीवरुन रुपये २ कोटी इतकी वाढ करण्यात आली होती. त्यात आता रुपये २ कोटीवरुन रुपये ३ कोटी इतकी वाढ करण्यात येत आहे. आमदार स्थानिक विकास निधीच्या रकमेतील वार्षिक १० टक्के रक्कम शासकीय मालमत्तांच्या देखभाल दुरुस्तीकरिता राखीव ठेवण्याचे प्रस्तावित आहे.

मानव विकास कार्यक्रम

८७. संयुक्त राष्ट्रामार्फत निश्चित केलेल्या ‘शाश्वत विकास ध्येयांतर्गत’ २०३० पर्यंत काही महत्त्वाची उद्दीष्टे साध्य करण्यास मानव विकास कार्यक्रम

निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. या पार्श्वभूमीवर मानव विकास कार्यक्रमाचे विस्तारीकरण व अधिक प्रभावी अंमलबजावणी अपेक्षित असून आरोग्य, शिक्षण व रोजगार निर्मिती या तीन घटकांकरिता जिल्ह्याऐवजी तालुका स्तरावर अधिक भर देऊन 'मानव विकास निर्देशांका' मध्ये वाढ होण्यासाठी सन २०२०-२१ मध्ये रुपये १ हजार कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**डोंगरी तालुक्याचा विकास**

८८. डोंगरी तालुक्यांच्या विकास कामांसाठी विशेष तरतूद करुन प्रलंबित कामे गतीने पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. या प्रयोजनार्थ सन २०२०-२१ मध्ये रुपये ९५ कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**पाचगणी महाबळेश्वर विकास आराखडा**

८९. पाचगणी-महाबळेश्वर विकासाअंतर्गत वेण्णा तलावाच्या सुशोभीकरणासह आराखड्याकरिता सन २०२०-२१ मध्ये रुपये १०० कोटी इतका नियतव्यय राखीव आहे. हे करताना तेथील पर्यावरणाची जोपासना करुन जबाबदार पर्यटनाला चालना देण्यात येईल.

**सन २०२०-२१ या वर्षात नियोजन विभागास कार्यक्रमावरील बाबींकरिता रुपये ४ हजार २५७ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.**

**सार्वजनिक उपक्रमातील कर्मचाऱ्यांना ७वा वेतन आयोग**

९०. राज्यातील ३१ सार्वजनिक उपक्रमांना ७वा वेतन आयोग लागू करण्याचे प्रस्तावित आहे. त्याचा लाभ १२ हजार ७५१ कर्मचाऱ्यांना होईल.

**थोर व्यक्तींच्या स्मारकांची कामे**

९१. माणगाव, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत १०० वर्षापूर्वी झालेल्या अस्पृश्यता निवारण परिषदेच्या स्मरणार्थ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, दापोली येथे महर्षी धोंडो केशव कर्वे, पां. वा. काणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व आचार्य विनोबा भावे या भारतरत्नांचे एकत्रित स्मारक, माजी मुख्यमंत्री स्व. शंकरराव चव्हाण यांचे स्मारक, माजी मुख्यमंत्री स्व. विलासरावजी देशमुख यांचे स्मृती भवन, माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे, माजी उपमुख्यमंत्री

आर. आर. पाटील, लोकनेते कै. बाळासाहेब देसाई यांचे पाटण, जि. सातारा, येथील शताब्दी स्मारक, मंगळवेढा, जि. सोलापूर येथील श्री संत चोखामेळा आणि जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे स्मारक, कोल्हापूर येथील शाहू मिलमधील शाहू महाराजांचे स्मारक, स्वातंत्र्यसेनानी राघोजी भांगरे यांचे मौ. वासाळी, जि. नाशिक येथील स्मारक, राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू स्मारक, या कामांकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये ३५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

तीर्थक्षेत्रांचा विकास

९२. माहूरगड, जि. नांदेड, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, जि. हिंगोली, नर्सी नामदेव, जि. हिंगोली, पाथरी, जि. परभणी, प्राचीन शिवमंदिर, अंबरनाथ हजरत ख्वाजा शमनामिरा दर्गा, मिरज या तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरिता आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची १५० वी जयंती

९३. राष्ट्रपिता महात्मा गांधींचे विचार व तत्त्वे याचा प्रचार व प्रसार करण्याकरिता विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. मुंबईतील राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या वास्तव्याने पावन झालेल्या ‘मणीभवन’ या वास्तू व संग्रहालयाचे नूतनीकरण करण्याचा मानस आहे. त्याकरिता सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रुपये २५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र राज्याचा हीरक महोत्सव

९४. सन २०२० हे महाराष्ट्राच्या स्थापनेचे हीरक महोत्सवी वर्ष असून विविध कार्यक्रमांद्वारे हे वर्ष साजरे करण्यात येणार आहे. त्याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये ५५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालय

९५. सातारा येथील छत्रपती शिवाजी महाराज संग्रहालयास रुपये १२ कोटी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

९६. पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासाठी रुपये ४ कोटी उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावित आहे.

अखिल भारतीय नाट्य संमेलन

९७. यावर्षी होणाऱ्या १०० व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाच्या निमित्ताने नाट्य संमेलनास देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करुन ते रुपये १० कोटी इतके करण्यात येईल.

## सामाजिक सेवा

सामाजिक न्याय विभाग

९८. समाजातील वंचित घटकांच्या विकासाकरिता हे सरकार वचनबद्ध आहे. सामाजिक न्याय विभागांतर्गत अनुसूचित जाती उपयोजनेखाली शाळा, आरोग्यसेवा, रमाई आवास घरकुल योजना, विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहे, आश्रमशाळा, विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती, परदेशी शिष्यवृत्ती योजना यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

प्रज्ञासूर्य, बोधीसत्व भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१६ ते १९२२ या कालावधीत लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये उच्च शिक्षण घेतले. या घटनेस सुमारे १०० वर्षे पूर्ण होत असल्याने, या संस्थेत त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ त्यांच्या नांवे अध्यासन सुरु करण्याचे शासनाने ठरविले आहे.

पुणे येथे नोकरी करणाऱ्या मागासवर्गीय महिलांसाठी १,००० निवासी क्षमतेचे वसतिगृह तसेच मुंबई व पुणे विद्यापिठात मागासवर्गीय मुला-मुलींसाठी प्रत्येकी ५०० निवासी क्षमतेची वसतिगृहे उभारण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्याशिवाय नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटर, चिंचोली येथील स्मारक तथा साधना केंद्राचे काम पुरेसा निधी उपलब्ध करुन पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

विधवा, परित्यक्ता, घटस्फोटिता, दिव्यांग व निराधार या सर्व दुर्बल घटकांच्या कल्याणाला प्राधान्य देऊन पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे धोरण असून **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाला सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ९ हजार ६६८ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.**

तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याण मंडळ

९९. तृतीयपंथीय समाजाच्या कल्याणासाठी तसेच त्यांना समाजाच्या विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणासाठी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये ५ कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार महामंडळ**

१००. लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोडणी कामगार महामंडळास कल्याणकारी योजना राबविण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यास शासन वचनबद्ध आहे. तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलींसाठी वसतीगृहे बांधण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**आदिवासी विकास विभाग**

१०१. अनुसूचित जनजाती उपयोजनेंतर्गत आश्रमशाळा, आरोग्यसेवा, वसतिगृहे, शासकीय आश्रमशाळा कायापालट अभियान, नामांकित शाळा व 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना' यांसारखे अनेक उपक्रम राबविण्यात येतात. हे सर्व उपक्रम राबविण्यासाठी **आदिवासी विकास विभागाला सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ८ हजार ८५३ कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.**

**अल्पसंख्याक विकास विभाग**

१०२. अल्पसंख्याकांच्या विकासासाठी मौलाना आझाद मोफत शिकवणी व अन्य योजना, डॉ. झाकीर हुसेन मदरसा आधुनिकीकरण योजना, ग्रामीण क्षेत्र विकास योजना, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाला सहाय्यक अनुदान, राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजना, राज्यातील अल्पसंख्याक समुदायातील युवकांसाठी क्रीडा विषयक योजना, अल्पसंख्याक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींच्या वसतिगृहामध्ये भोजनाची सुविधा, पोलीस शिपाई भरतीपूर्व निवासी परीक्षा प्रशिक्षण वर्ग योजना, प्रधानमंत्री जनविकास कार्यक्रम इत्यादी उपक्रम राबविण्यासाठी **अल्पसंख्याक विकास विभागास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ५५० कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.**

१०३. हज यात्रेकरुंच्या सुविधेसाठी ठाणे जिल्हांत मुंब्रा कळवा येथे 'हज' हाऊसचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.

**अल्पसंख्यांक समुदायातील विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना**

१०४. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागसवर्ग व विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांच्या धर्तीवर अल्पसंख्याक समुदयातील आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांना पदविका, पदवी, पदव्युत्तर व पी.एच.डी. अभ्यासक्रमाकरिता परदेशी शिक्षणासाठी नवीन शिष्यवृत्ती योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या बाबीकरिता सन २०२०-२१ या वर्षात रुपये १२० कोटी नियतव्यय प्रस्तावित

आहे. प्रत्यक्षात गोरगरिबांच्या मुलां-मुलींनाही मदत मिळेल याची खबरदारी आम्ही घेऊ.

**इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभाग**

१०५. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत विजाभज विद्यार्थ्यांकरिता आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी आश्रमशाळा, विद्यनिकेतन, धनगर समाजासाठीच्या विविध योजना, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह योजना, तांडावस्ती मुक्त वसाहत योजना, इतर मागासवर्ग विद्यार्थी वसतिगृहे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती इत्यादी उपक्रम राबविण्यासाठी **इतर मागासवर्ग व बहुजन विकास विभागास सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ३ हजार कोटी नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला आहे.**

१०६. छत्रपती शाहू महाराज संशोधन प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे या संस्थेची स्वायत्तता अबाधित ठेवून संस्थेच्या कामकाजासाठी सर्वतोपरी मदत केली जाईल. या संस्थेसाठी सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात रुपये ५० कोटी नियतव्यय प्रस्तावित आहे.

**जिल्हा वार्षिक योजना**

१०७. सन २०१९-२० च्या योजनेंतर्गत रुपये ९ हजार कोटी रुपयांच्या तुलनेत यावर्षी रुपये ८०० कोटी इतकी वाढीव तरतूद करण्यात आली असून सन २०२०-२१ मध्ये जिल्हा वार्षिक योजनेसाठी रुपये ९ हजार ८०० कोटी तरतूद उपलब्ध होणार आहे.

जिल्हा वार्षिक योजनेतील नियतव्ययापैकी ३ टक्क्यांपर्यंतचा निधी पुढील दोन वर्षांकरिता पोलिसांच्या वाहनासाठी राखीव ठेवण्याचे प्रस्तावित आहे. शासकीय शाळा खोल्यांच्या दुरुस्तीसाठी व अंगणवाडी बांधकामासाठी विविध योजनांमधून निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**वार्षिक योजना २०२०-२१**

१०८. सन २०२०-२१ मध्ये कार्यक्रम खर्चाची रक्कम रुपये १ लक्ष १५ हजार कोटी इतकी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अनुसूचित जाती उपयोजनेच्या रुपये ९ हजार ६६८ कोटी तर आदिवासी विकास उपयोजनेच्या रुपये ८ हजार ८५३ कोटी नियतव्ययाचा समावेश आहे.

सुधारित अंदाज २०१९-२०

१०९. सन २०१९-२० चे अंदाजपत्रकात महसूली जमा रुपये ३ लक्ष १४ हजार ६४० कोटी अपेक्षित होती. मात्र यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे यावर्षी केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या राज्य हिश्श्याच्या कराच्या रक्कमेत रुपये ८ हजार ४५३ कोटी घट झाली आहे. या सर्व बाबींचा विचार करुन महसूली जमेचे सुधारित अंदाज रु. ३ लक्ष ९ हजार ८८० कोटी निश्चित करण्यात आले आहेत.

सन २०१९-२० च्या एकूण खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज रुपये ३ लक्ष ७८ हजार ६०० कोटी व सुधारित अंदाज रुपये ३ लक्ष ९० हजार ७८७ कोटी इतके असून, शेतकऱ्यांना केलेली भरीव मदत, ७ व्या वेतन आयोगाची अंमलबजावणी इत्यादी कारणांमुळे सन २०१९-२० या वर्षाच्या खर्चाच्या सुधारित अंदाजात वाढ झाली आहे.

अर्थसंकल्पीय अंदाज सन २०२०-२१

११०. सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पामध्ये महसुली जमा रुपये ३ लक्ष ४७ हजार ४५७ कोटी व महसुली खर्च रुपये ३ लक्ष ५६ हजार ९६८ कोटी अंदाजित केला आहे. परिणामी रुपये ९ हजार ५११ कोटीची महसुली तूट येत आहे. सध्या अर्थव्यवस्थेत संथपणा असल्याच्या काळात लोककल्याणकारी योजनांवर खर्च करणे तसेच राज्याच्या अर्थव्यवस्थेला चालना देणे अपरिहार्य ठरत असल्याने ही तूट स्वीकारणे क्रमप्राप्त आहे. राज्याच्या विकासासाठी जी उद्दीष्टे निश्चित केली आहेत, त्यांच्या पूर्तीसाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करेल, अशी ग्वाही या सभागृहास व राज्यातील जनतेला देऊन आता मी अर्थसंकल्पाच्या भाग दोनकडे वळतो.